IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
ISSN 2455-4375

# गो. नी. दांडेकर यांच्या स्मरणगाथेतील भावविश्व

**कु. दिपाली खोबारखेडे**
संशोधक विद्यार्थिनी
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

**डॉ. सौ.भारती खापेकर**
मार्गदर्शक
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

---

***सारांश :***

*गो. नी. दांडेकर हे महाराष्ट्रातील प्रतिभासंपन्न, समजचिंतक, कार्यकर्ता आणि साहित्यिक असे सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.त्यांनी त्यांच्या साहित्यातून त्यांच्या अखंड अशा प्रवासवर्णनातून आलेल्या मानवी जीवनातील सखोल भावना मेळ साधला आहे.स्मरणगाथेत कथन केलेले अनुभव,त्यातील भावविश्व मनाला भुरळ घालणारे आहे. बालपणापासून त्यांच्यावर झालेले संस्कार त्यांच्या साहित्यात दिसून येतात. स्मरणगाथा हे फक्त आत्मचरित्र नसून एका साहित्यिकाने अनुभवलेले, जगलेले व जाणलेले विश्व आहे.*

*दांडेकर यांचे आयुष्य म्हणजे जीवनाशी कृतज्ञ असलेल्या अवलियाची यशोगाथा आहे. स्मरणगाथा हे एका भावनिक परंतु भावनाशून्य असलेल्या लेखकाचे भावविश्व आहे. हे केवळ आत्मनिवेदन नसून दांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे अप्रतिम असे साहित्य आहे. या शोधप्रबंधात स्मरणगाथेतील भावविश्वाचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न असेल.*

---

**प्रस्तावना :**

गो.नी. दांडेकर एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून साहित्य क्षेत्रात ओळखले जातात. त्यांच्या लेखनाचा मराठी साहित्यावर अमित ठसा उमटलेला आहे. त्यांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी अमरावती जिल्ह्यातील परतवाडा या गावी झाला. आणि १ जून १९९८ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या वडिलांचे नाव नीलकंठ दांडेकर व आईचे नाव अंबिका होते.

त्यांनी मराठी साहित्याला मृण्मयी, बिंदूची कथा, शितू, पडघवली, जैत रे जैत, माचीवरला बुधा, मोगरा फुलला यासारख्या अप्रतिम कादंबऱ्या दिल्या. त्याचबरोबर त्यांना आलेल्या प्रदीर्घ प्रवासाचा अनुभव दुर्गदर्शन, दुर्गभ्रमणकथा यांसारख्या कादंबऱ्यात त्यांनी वर्णन केलेला आहे. ऐतिहासिक व्यक्तिरेखांवर आधारित मोगरा फुलला, कृष्णाय कर्णआयण इत्यादी कादंबऱ्या साहित्य क्षेत्रात महिलाचा दगड मानल्या जातात पूर्ण माहिती लेखन ही त्यांची वऱ्हाडी बोलीतील कादंबरी.

स्मरणगाथा हे गोनिदांचे आत्मचरित्र यात त्यांनी त्यांच्या जीवनातील अनेक नाट्यपूर्ण तसेच मनाला

भिडणाऱ्या प्रसंगाचे अतिशय रसरशीत वर्णन केले आहे. हे केवळ आत्मचरित्र नसून त्यांच्या संघर्षमय वृत्तीचे दर्शन आहे. त्याचबरोबर त्यांच्या जीवनाविषयी दृष्टिकोनाची ओळख करून देणारे असे साहित्य आहे .हे पुस्तक म्हणजे त्यांच्या अंतरंगातून आलेले प्रांजळ आत्मनिवेदन आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांचे बालपण, विविध क्षेत्रातील अनुभव, गाडगेबाबांबरोबरचा सहवास, ज्ञानेश्वरी वाचन, महाराष्ट्र भ्रमण आणि त्याबरोबर जीवनात आलेले चढ-उतार यांचे अतिशय सोप्या शब्दात वर्णन केलेले दिसून येते. स्मरणघातेचे खरे वैशिष्ट्य म्हणजे त्यात व्यक्त झालेले लेखकांचे संवेदनशील मन, निसर्ग प्रेम आणि मानवी मूल्यांवरील अतोनात निष्ठा होय. या साहित्यकृतीला १९७७ साली साहित्यकारणीचा पुरस्कार मिळाला.

**भावविश्व :**

स्मरणगाथेतील भावविश्व विविध पैलूंनी नटलेले आहे. त्यातील भावविश्वाची रचना अनेक महत्त्वपूर्ण घटकांनी मिळून झाली आहे.

**कुटुंब :**

गोनिदांच्या जीवनात त्यांच्या कुटुंबाचे स्थान खूप उंचावर आहे आणि त्यांच्या भाव विश्वाचा केंद्रबिंदू देखील आहे. बालपणी आई-वडिलांनी त्यांच्यावर जी मूल्यांची रुजवणूक केली त्याबद्दलचा आदरभाव स्मरणगाथा वाचताना वेळोवेळीचा जाणवतो. त्यावेळी भ्रमंती करत असताना वेळोवेळी भेटलेल्या व्यक्ती, मित्र,गुरु या सर्वांबद्दल असलेला स्नेह आणि त्यांनी केलेले मार्गदर्शन सहर्षाने स्वीकारले.

**संघर्ष :**

दांडेकर यांचे जीवन सुखमय असे नव्हते बालपणापासूनच आर्थिक आणि मानसिक संघर्ष त्यांच्या जीवनात होते. घरातील परिस्थिती खूप चांगली नसतानाही संस्कारांच्या बळावर त्यांनी त्यांची उच्च शिखरे गाठली.

घरातून पलायन केल्यावर आयुष्यात आलेले चढ-उतार,अपयश, निराश होणारे असे क्षणही त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने आणि मूल्यांची जपणूक करून हाताळले त्यांचे हे व्यक्तिमत्व वाचकांना प्रेरणादायी असे ठरते.

**आध्यात्मिक तत्त्वज्ञान :**

त्यांच्या भावविश्वाला आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा भक्कम आधार मिळाला. त्यांच्या विचारांवर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचा पडलेला प्रभाव त्यांच्या साहित्याबरोबरच जीवनावरही पडलेला दिसून येतो. ईश्वरनिष्ठा आणि मानवधर्मावर असलेला त्यांचा विश्वास त्यांना योग्य दिशा दाखवतो  त्यांची वृत्ती सेवाभावी स्वरूपाची होती. गाडगेबाबांच्या सहवासात असताना असे अनेक प्रसंग त्यांच्या या दृष्टिकोनाची साक्ष देतात.

**भावविश्वाचे साहित्यिक मूल्य :**

गो. नी दांडेकर यांच्या स्मरणगाथेतील भावविश्व त्यांच्या सहज भाषेमुळे प्रभावी ठरले आहे. त्यांची भाषा सामान्य माणसाची भाषा असल्यामुळे वाचकाला त्यांचे अनुभव आपलेच वाटतात त्यामुळे एक भावनिक जवळीक निर्माण होते. त्यांनी वापरलेल्या म्हणी,संस्कृत श्लोक,वाक्प्रचार त्या-त्या परिस्थितीला अगदी शोभून दिसतात. निसर्गाचे आणि व्यक्तिरेखांचे वर्णन करण्याची त्यांची पद्धत या कृतीला काव्यात्मक रूप आणते.

**निष्कर्ष :**

स्मरणगाथा या आत्मचरित्रातील भावविश्व हे कुटुंब, संघर्ष, अध्यात्मिक तत्त्वज्ञान,साहित्यिक मूल्य यांचा उत्कृष्ट असा संगम आहे. हे भावविश्व केवळ दांडेकरांच्या आयुष्यात घडणारे घटनांची माहिती देत नाही तर जीवनातील मूल्यावर चिंतन करण्यास प्रवृत्त करते. स्मरणगाथा हे अमूल्य आणि प्रेरणादायी आत्मचरित्र म्हणून चिरंजीव राहील. हे आत्मचरित्र एका फकीर आणि संवेदनशील कलावंताच्या अंतरंगाचे दर्शन घडवते हे आत्मचरित्र प्रत्येक गोष्टीत सौंदर्य शोधण्याची प्रेरणा देते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- स्मरणगाथा, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, १९७३
- बिंदूची कथा, मृण्मयी प्रकाशन पुणे, १९४७
- शितू, मृण्मयी प्रकाशन, पुणे १९५३
- पडघवली, मृण्मयी प्रकाशन, पुणे, १९५५
- माचीवरला बुधा, मृण्मयी प्रकाशन, पुणे, १९५८
- पूर्णामायची लेकर, मृण्मयी प्रकाशन, पुणे, १९५८
- जैत रे जैत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६५
- www.mymahanagar.com
- kfacts.in